| MHAK070013332024 | **फौ.कि.अर्ज क्र. १८४/२०२४ मधील निशाणी २ वरील आदेश**<br>अफसाना परवीन वि. अब्दुल अकील व इतर<br>(दिनांक २४ जुलै, २०२५) |
|---|---|

१. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ कलम २३ नुसार अंतरिम पोटगी मिळण्यासाठी अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार हिला दरमहा रु. ५,०००/–, अर्जदार क्र. २ याला रु. ३,०००/– व अर्जदार ३ हिला दरमहा रु. २,०००/– अर्ज दाखल तारखेपासुन अंतरिम पोटगीचा व गैरअर्जदारकडुन सदर अर्जाचा खर्च रु. १०,०००/– मिळण्याचा आदेश होण्याची विनंती केली आहे.

२. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे, अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ ची लग्नाची पत्नी असुन त्यांचे लग्न दिनांक ०१.०६.२०१६ रोजी मुस्लीम जाती रितीरिवाजाप्रमाणे बाळापूर, ता. बाळापूर, जि. अकोला येथे झाले. लग्नामध्ये अर्जदार क्र. १ च्या आई वडीलांनी सोन्या–चांदीचे दागीने व संसारोपयोगी वस्तु दिल्या आहेत. सर्व वस्तु व स्त्रीधन गैरअर्जदारांच्या ताब्यात आहे. सदर लग्न संबंधातुन अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांना दोन अपत्ये आहेत. गैरअर्जदार क्र. २ सासु, गैरअर्जदार क्र. ३ सासरे, गैरअर्जदार क्र. ४ ते ११ जेठ व जेठाण्या व गैरअर्जदार क्र. १२ दिर आहे.

३. अर्जदार क्र. १ ही लग्न झाल्यानंतर गैरअर्जदार क्र. १ च्या एकत्रित कुटुंबात नांदावयास गेल्यावर तिला दोन महिन्यापर्यंत चांगली वागणुक दिली. गैरअर्जदार क्र. २ व ३ यांनी अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांचेसोबत भांडण करुन त्यांना राहत्या घरातुन हाकलुन दिल्यामुळे ते दुसऱ्या घरात राहत होते. या कालावधीत अर्जदार अर्जदार क्र. २ मुलाचा जन्म झाला. या काळात गैरअर्जदार क्र. १ काही कारण नसतांना अर्जदार क्र. १ ला शिवीगाळ करुन भांडण करीत होता. अर्जदार क्र. १ च्या चारित्र्यावर संशय घेवुन तिला त्रास देत होता व खाण्यापिण्यासाठी घरात काहीही आणत नव्हता. अर्जदार क्र. १ हिने सदर बाब गैरअर्जदार क्र. २ व ३ यांना सांगितले असता ते उलट अर्जदार क्र.१ हिलाच अपमानजनक वागणुक देत होते. गैरअर्जदार क्र. १ ला भा.दं.वि. कलम ३७६ व पोक्सो कायदाप्रमाणेच्या प्रकरणात शिक्षा झाली असुन तो शिक्षा भोगुन घरी परत आला तेव्हा तो अर्जदार क्र. १ हिला चांगली वागणुक देत नव्हता. गैरअर्जदार

क्र. २ ते १२ अर्जदार क्र. १ च्या घरी येवुन तिला शिवीगाळ करुन तिच्याशी भांडण करीत होते. या काळात अर्जदार क्र. ३ मुलीचा जन्म झाला. मुलगी झाल्यावर गैरअर्जदार क्र. १ ते ३ अर्जदार क्र. १ हिला मुलगी आमची नाही असे म्हणुन तिच्या चारित्र्यावर संशय घेवुन तिला शारिरीक व मानसिक त्रास देत होते. सर्व गैरअर्जदार हे अर्जदार क्र. १ हिला तिच्या माहेरहुन रु. १,००,०००/– आणण्याचा तगादा लावत होते व पैसे न दिल्यास घटस्फोट देवुन बाळापुरला पाठवु व दुसरे लग्न करुन देवु असे सांगत होते. अर्जदार क्र. १ च्या आई वडीलांनी व नातेवाईकांनी सर्व गैरअर्जदारांना समजवण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी काही न ऐकता अर्जदार क्र. १ हिला मानसिक व शारिरीक त्रास दिला. मे २०२४ मध्ये सर्व गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ सोबत काही कारण नसतांना भांडण करुन तिल नेसत्या कपडयानिशी दोन्ही मुलांसह घराबाहेर काढुन दिले. अर्जदार क्र. १ ने गैरअर्जदार क्र. १ ला फोन करुन घेवुन जाण्याची विनंती केली असता त्याने स्पष्टपणे नकार दिला. दिनांक १३.०९.२०२४ रोजी अर्जदार क्र. १ व तिचे भाऊ हे स्वतःहुन सासरी मुर्तिजापुर येथे गेली असता सर्व गैरअर्जदार तिला घरात न घेता, तिच्या सोबत भांडण करुन तिला घराबाहेर काढुन दिले व पैशांची मागणी पुर्ण केली नाही म्हणुन नांदवत नाही, येथुन जा असे सांगितले. अर्जदार क्र. १ व तिच्या भावाचे गैरअर्जदारांनी काही ऐकले नाही म्हणुन नाईलाजाने परत तिच्या माहेरी येवुन राहत आहे.

**४.** गैरअर्जदार क्र. १ हे मिस्त्री काम करीत असुन दररोज रु. १०००/– ते रु. १५००/– कमवितात. तसेच गैरअर्जदार क्र. १ चे मुर्तिजापुर येथे पक्के बांधकाम असलेले मोठे घर आहे. गैरअर्जदारकडे मोठे किराणा दुकान असुन त्यापासुन त्यांना दरमहा रु. १,००,०००/– उत्पन्न मिळते. सर्व गैरअर्जदारांचे वेगवेगळे व्यवसाय असुन त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ अर्जदार यांचे व्यतिरिक्त कोणाचीही जबाबदारी नाही. अर्जदारांना कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही व स्वतःचा उदरनिर्वाह करणे असमर्थ आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ ला दरमहा रु. ५,०००/–, अर्जदार क्र. २ याला दरमहा रु. ३,०००/– व अर्जदार क्र. ३ ला दरमहा रु. २,०००/– अंतरिम पोटगी अर्ज दाखल तारखेपासुन देण्याची विनंती केली आहे.

**५.** गैरअर्जदार क्र. १ ते १२ यांनी प्रस्तुत अर्जावर नि. ९ अन्वये त्यांचे म्हणणे दिलेले आहे. गैरअर्जदारांनी अर्जदारासोबत असलेले नातेसंबंध मान्य केले असुन

अर्जातील इतर कथने अमान्य केलेली आहेत. गैरअर्जदारांनी त्यांच्या अधिकच्या कथनात म्हटले की, अर्जदार क्र. १ व गैरअअर्जदार क्र. २ ते १२ कधीही एकत्र राहिले नाही व तिला त्रास दिला नाही. अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदार यांना त्रास देण्याकरीता व त्यांच्यावर मानसिक दडपण आणण्याकरीता प्रकरणामध्ये समाविष्ट केले आहे. अर्जदार क्र. १ कडे कोणताही सबळ पुरावा नसतांना केस दाखल केली असुन प्रकरण गैरअर्जदार क्र. २ ते १२ विरुध्द खारिज करण्याची विनंती केली आहे. गैरअर्जदार क्र. १ ला भा.दं.वि. कलम ३७६ च्या प्रकरणात निर्दोष सोडण्यात आले आहे. गैरअर्जदार क्र. १ मजुरीचे काम करतो. अर्जदार क्र. १ ने गैरअर्जदार क्र. १ च्या साध्या स्वभावाचा गैरफायदा घेतला आहे. गैरअर्जदार क्र. १ हा नियाजोद्दीन नजीरोद्दीन या ठेकेदाराकडे काम करीत होता. अर्जदार क्र. १ हिचे ठेकेदार नियाजोद्दीन नजीरोद्दीन सोबत अनैतिक संबंध असुन गैरअर्जदार क्र.१ च्या भावाच्या पत्नीने अर्जदार क्र. १ व ठेकेदार यांना आपत्तीजनक परिस्थितीत पाहले व ती ओरडल्यामुळे सर्व शेजारी जमा झाले. गैरअर्जदार क्र. १ हे अर्जदार क्र. १ व ठेकेदार यांचा रिपोर्ट पोलीस स्टेशन, मुर्तिजापुर येथे देण्यासाठी गेले असता अर्जदार क्र. १ ने ठेकेदार सोबत राहयचे असुन त्याच्याशी लग्न करणार आहे असे सांगितले. सदर बाब गैरअर्जदार क्र. १ अर्जदार क्र. १ चे वडील, भाऊ व नातेवाईकांना सांगितले असता त्यांनी अर्जदार क्र. १ हिला मारहाण करुन बाळापुरला घेवुन गेले. गैरअर्जदार क्र. १ कडे ठेकेदार व अर्जदार क्र. १ चे अनैतिक संबंधाचे पुरावे मिळाले असुन अर्जदार क्र. १ च्या गादीखाली झोपेच्या गोळयांचे पाकीट मिळाले असुन सदर गोळया अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ ला जेवणात किंवा पाण्यात देत होती. गैरअर्जदार क्र. १ ने ठेकेदार व अर्जदार क्र. १ विरुध्द पोलीस स्टेशन, मुर्तिजापुर येथे ३ ते ४ रिपोर्ट दिल्यामुळे अर्जदार क्र. १ ला सासरी येण्याची लाज वाटत असल्यामुळे ती स्वतःहुन माहेरी राहते व मुलांनाही स्वतः जवळ ठेवले आहे. अर्जदार क्र. १ हिला गैरअर्जदार क्र. १ सोबत संसार करायचा नाही. अर्जदार क्र. १ ला मुर्तिजापुर न्यायालयात बोलावणे झाल्यामुळे तिने सदरहु खोटे प्रकरण गैरअर्जदारांना त्रास देण्याच्या उद्देशाने दाखल केले आहे.

६. गैरअर्जदार क्र. १ मजुरीचे काम करतो. गैरअर्जदार क्र. १ वर त्याच्या आई वडीलांची जबाबदारी असुन त्यांचा औषधोपचार करावा लागतो. गैरअर्जदार क्र. १ मुलांना वागविण्यास तयार आहे. गैरअर्जदार क्र. १ अर्जदार क्र. १ हिला अंतरिम पोटगी

देण्यास असमर्थ आहे. अर्जदार क्र. १ ही रु. २००/– ते रु. ३००/– मजुरी मिळवते असुन ती गैरअर्जदार क्र. १ वर अवलंबु नाही. गैरअर्जदारांनी कोणताही कौटुंबिक हिंसाचार अर्जदारावर केलेले नाही. त्यामुळे सदर अर्ज खारिज करण्याची विनंती केली आहे.

७. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदार व गैरअर्जदार यांचा युक्तिवाद ऐकला. गैरअर्जदार यांनी नि.क्र. २६ वर त्यांचा लेखी युक्तिवाद दाखल केला आहे.

८. उभयपक्षांच्या कथनांच्या पार्श्वभुमीवर प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाप्रत पोहोचण्याकरीता खालील प्रश्न विचारार्थ येतात. सदर प्रश्नांवर सुसंगत कारणमिमांसेसह निष्कर्ष नोंदविले, ते खालील प्रमाणे–

| <u>अ.नं.</u> | <u>प्रश्न</u> | | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार हिने गैरअर्जदारांकडून तिचा कौटुंबिक हिंसाचार होत असल्याचे सकृतदर्शनी सिध्द केले आहे का ? | .. | **अशंतः होकारार्थी** |
| २. | गैरअर्जदार क्र.१ ला उत्पन्नाचे पुरेसे साधन असतानाही त्याने कोणत्याही योग्य कारणाशिवाय अर्जदारांचा सांभाळ करण्यास नकार दिल्याचे किंवा दुर्लक्ष केल्याचे अर्जदाराने सिध्द केले आहे का ? | .. | **अंशतः होकारार्थी** |
| ३. | अर्जदार मागणीप्रमाणे अंतरिम आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | | **अंशतः होकारार्थी** |
| ४. | आदेश काय ? | .. | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>प्रश्न क्र. १ ते ३ बाबत</u> :–**

९. अर्जदार यांचा मुळ अर्ज, निशाणी २ वरील अंतरीम अर्ज तसेच गैरअर्जदार क्र. १ ते १२ चे नि.क्र. ९ वरील म्हणणे पाहता उभयपक्षाने विवाह नाते संबंध इत्यादी बाबी मान्य आहे.

**१०.** अर्जदाराच्या कथनानुसार गैरअर्जदार यांनी तिचा शारिरीक व मानसिक छळ करुन सासरहुन हाकलुन दिल्यापासुन ती माहेरी दुःखी व कष्टदायक जीवन जगत असुन ती तिच्या जिवनावश्यक मुलभुत गरजा भागवण्यास असमर्थ आहे. अर्जदाराला उत्पन्नाचे स्वतंत्र कोणतेही साधन नाही. तसेच अर्जदाराचे म्हणणे की, गैरअर्जदार क्र. १ हे मिस्त्री काम करीत असुन त्यांना दररोज रु. १०००/– ते रु. १५००/– कमवितात. तसेच गैरअर्जदार क्र. १ चे मुर्तिजापुर येथे पक्के बांधकाम असलेले मोठे घर आहे. गैरअर्जदारकडे मोठे किराणा दुकान असुन त्यापासुन त्यांना दरमहा रु. १,००,०००/– उत्पन्न मिळते. अर्जदाराने नि.क्र. ४ वर तिच्या उत्पन्नाबाबत मालमत्ता आणि दायित्व प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केले आहे. अर्जदार यांचे राहणीमान, जिवनावश्यक वस्तुंचा दर, गरजा पाहता या अर्जाचा निकाल लागेपर्यंत तिने अर्जदार क्र. १ ला दरमहा रु. ५,०००/– , अर्जदार क्र. २ ला दरमहा रु. ३,०००/– व अर्जदार क्र. ३ ला दरमहा रु. २,०००/– अंतरिम पोटगी व अर्जाचा खर्च रु. १०,०००/– देण्याबाबत आदेश होण्याची विनंती केली आहे.

**११.** गैरअर्जदार यांनी त्यांचे कथनात असे कथन केले आहे की, गैरअर्जदार यांनी कोणताही कौटूंबिक हिंसाचार केलेला नाही. अर्जदार ही स्वतःहुन विनाकारण माहेरी राहत असुन त्रयस्थ इसमासोबत विवाह बाहय संबंध ठेवुन गैरअर्जदार क्र. १ ची फसवणुक करुन गैरअर्जदार क्र. १ चे वैवाहिक जिवन उध्वस्त केले आहे. गैरअर्जदारांना फक्त त्रास देण्याच्या हेतुने खोटा अर्ज दाखल केलेला आहे. गैरअर्जदार क्र. १ यांनी त्यांचे मालमत्ता आणि दायित्वाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र. १० वर दाखल केले.

**१२.** वर नमुद केल्याप्रमाणे उभयपक्षांमधील नातेसंबंध मान्य असल्याने अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र.१ ची कायदेशीर विवाहाची पत्नी व अर्जदार क्र. २ व ३ अपत्ये आहेत. अर्जदारांशी असलेले नातेसंबंध मान्य असल्यामुळे अर्जदारांची पालन पोषणाची, उदरभरणाची सर्वस्वी कायदेशीर व नैतिक जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ यांची आहे.

**१३.** अर्जदार क्र. १ ने गैरअर्जदारांनी तिला शारिरीक व मानसिक छळ केल्याचे कथन केलेले आहे. कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणात अंतरिम अर्ज निकाली करतांना अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे किंवा नाही त्या करीता सबळ

पुराव्याची आवश्यकता नाही. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चा मुख्य उद्देश कौटुंबिक हिंसाचारा पासुन महिलांचे संरक्षण करणे होय व सदर तरतुदीनुसार कोणतीही एका छता खाली राहणारी व्यथित व्यक्तीवर कौटुंबिक हिंसाचार झालेला असल्यास अर्ज करु शकते. त्यामुळे या ठिकाणी अर्जदारावर सकृतदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे किंवा नाही बाब पाहावी लागेल. अर्जदार हिने तिच्या वाद कथनामधील मजकुर शपथेवर सांगितलेला असल्याने प्रथमदर्शनी गैरअर्जदार यांनी अर्जदारावर कौटूंबिक हिंसाचार केल्याचे दिसून येते.

**१४.** अर्जदाराचे मालमत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्र पाहिल्यास असे दिसून येते की, अर्जदाराचे शिक्षण इयत्ता ८ पर्यंत झालेले आहे व तिचा मासिक खर्च रु. १०,०००/- आहे. प्रतिज्ञापत्रात नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ हे मिस्त्री काम करीत असुन त्यांना दररोज रु. १०००/- ते रु. १५००/- कमवितात. तसेच गैरअर्जदार क्र. १ चे मुर्तिजापुर येथे पक्के बांधकाम असलेले मोठे घर आहे. गैरअर्जदारकडे मोठे किराणा दुकान असुन त्यापासुन त्यांना दरमहा रु. १,००,०००/- उत्पन्न मिळते. सर्व गैरअर्जदारांचे वेगवेगळे व्यवसाय असुन त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली असल्याचे शपथेवर सांगितलेले आहे. याउलट गैरअर्जदार क्र.१ यांनी मालमत्ता दायित्व प्रतिज्ञापत्र नि.क्र. १० वर दाखल केले असुन त्यांनी त्यांच्या मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्रात गैरअर्जदारावर त्यांच्यावर म्हातारे आई व वडील अवलंबुन असल्याचे कथन केलेले आहे. सदर प्रतिज्ञापत्रात गैरअर्जदार क्र. १ चे इयत्ता ७ पर्यंत शिक्षण झालेले असल्याचे नमुद आहे. गैरअर्जदार यांनी त्यांच्या लेखी जबाबात अर्जदाराने अर्जात नमुद केलेल्या उत्पन्नाच्या साधनाबाबतचा मजकुर अमान्य केलेला आहे. गैरअर्जदार यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार ही स्वतःहुन माहेरी निघुन गेलेली आहे.

**१५.** अर्जदाराच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ हे मिस्त्री काम करीत असुन त्यांना दररोज रु. १०००/- ते रु. १५००/- कमवितात. गैरअर्जदारकडे मोठे किराणा दुकान असुन त्यापासुन त्यांना दरमहा रु. १,००,०००/- उत्पन्न मिळते, या करिता अर्जदार क्र. १ ने कोणताची कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदारांच्या उत्पन्नाबाबत अभिलेखावर शब्दाशिवाय कोणताही पुरावा नाही असे असले तरी, गैरअर्जदार क्र.१ त्याच्या अर्जदाराप्रती असलेल्या जबाबदारीतून

मुक्त होवू शकत नाही.

**१६.** गैरअर्जदार क्र. १ हा सदृढ व्यक्ती (able bodied person) म्हणुन मोलमजुरी किंवा इतर कोणतेही काम करुन गैरअर्जदार क्र. १ प्रतिमाह रु. १०,०००/– ते १५,०००/– सहज कमवु शकतो. अर्जदार यांच्या जिवनावश्यक तसेच वैद्यकीय खर्चासह दरमहा खर्च व गैरअर्जदार यांच्या उत्पन्नाचा विचार करता व गैरअर्जदार क्र.१ यांच्यावरील कौटुंबिक जबाबदारी पाहता या अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार क्र. १ हिला रु. १५००/– व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी रु. १०००/– असे एकुण दरमहा रु. ३५००/– एकत्रित अंतरीम पोटगी अर्ज दाखल तारखेपासुन देणे योग्य राहील. अर्जदारांच्या पालन पोषणाची सर्व जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ ची आहे. अर्जदार हिने अंतरिम अर्जाच्या खर्चाच्या रकमेची मागणी केलेली आहे. परंतु अर्जदाराची सदर मागणी प्रकरणाच्या या टप्प्यावर विचारात घेणे योग्य होणार नाही. वरील सर्व परिस्थिती विचारात घेता मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर 'अंशतः होकारार्थी' देऊन पुढील प्रमाणे आदेश करते.

## आदेश

| | |
|---|---|
| (१) | अर्ज नि.क्र. २ अंशतः मंजुर करण्यात येतो. |
| (२) | गैरअर्जदार क्र. १ याने अर्ज दाखल तारखेपासुन मुळ अर्जाचा अंतीम निकालापर्यंत अर्जदार क्र. १ ते ३ यांना एकत्रित दरमहा रु.३५००/– (रुपये तीन हजार पाचशे मात्र) इतकी अंतरिम पोटगी द्यावी. अर्जदार क्र. २ व ३ यांना अंतरिम पोटगी म्हणुन प्रत्येकी रु. १०००/– दरमहा ते सज्ञान होईपर्यंत द्यावी. |
| (३) | सदर आदेशाची प्रत अर्जदार यांना विनामुल्य देण्यात यावी. |
| (४) | गैरअर्जदार क्र. १ याने अंतरिम पोटगी देण्यास कसुर केल्यास अर्जदार यांना कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ कलम ३१ अन्वये कार्यवाही करण्याची मुभा राहील. |

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.07.25 12:19:27 +0530

दिनांक : २४/०७/२०२५.
ठिकाणः बाळापूर

( श्रीमती डी. एम. पाटील )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
| Name of the Court | :- | **Smt. D. M. Patil**<br>Civil Judge, J.D. & J.M.F.C.,<br>Balapur |
| Name of the Stenographer | :- | A.S.Gawali |
| Date of Decision | :- | 24/07/2025 |
| Order signed by P.O on | :- | 24/07/2025 |
| Order uploaded on | :- | 25/07/2025 |